# जिल्हा परिषद जळगाव
## (सामान्य प्रशासन विभाग)

फोन नं:-०२५७-२२२४२५५ Email . dyceogenjalgaon@gmail.com

कालमर्यादीत जा.क्र.साप्रवि/आस्था11/आरआर/ईफाईल क्रमांक/1595660/2024

प्रति,

श्री/श्रीमती-----------------------------

------------------------------------.

------------------------------------

**विषय:**- अनुकंपा नियुक्तीसाठी गट –क किंवा गट-ड चा पसंतीक्रम देणे बाबत..

**संदर्भ:**-1)जि.प.जळगांव मार्फत दिनांक 02/05/2025 रोजी प्रसिध्द करण्यांत आलेली अनुकंपा जेष्ठता यादी.

2) महाराष्ट्र शासन , सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्र.अकंपा-2025/प्र.क्र.121/म.लो.आ. दिनांक 17 जुलै 2025

3) महाराष्ट्र शासन , ग्राम विकास विभाग , शासन निर्णय क्र.अकंपा-1225/प्र.क्र.442/आस्था-7 दिनांक 31 जुलै 2025

उपरोक्त संदर्भ क्र. 1 अन्वये जि.प.जळगांव कडील गट-क व गट-ड ची अनुकंपा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

शासन स्तरावरुन अनुकंपा नियुक्तीसंबंधीचे वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेले दिनांक 17/07/2025 च्या शासन निर्णयात नमुद केलेले सर्व शासन निर्णय व परिपत्रके अधिक्रमित करुन महा.शासन सामान्य प्रशासन विभागाकडील उपरोक्त संदर्भ क्र.2 मधे नमुद दिनांक 17 जुलै,2025 च्या शासन निर्णयानुसार अनुकंपा नियुक्ती संदर्भात सर्वसमावेशक सुधारीत धोरण निश्चित करण्यांत आलेले असून महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील उपरोक्त संदर्भ क्र.3 मधे नमुद दिनांक 31 जुलै, 2025 च्या शासन निर्णयात नमुद बदलांसह साप्रवि कडील दिनांक 17 जुलै,2025 च्या शासन निर्णयातील उर्वरीत सर्व तरतुदी जशा आहेत तशा सर्व जि.प. गट-क व गट-ड कर्मचा-यांना लागू करण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने शासन निर्णयातील तरतुदी नुसार अनुकंपा उमेदवारांची शैक्षणिक अर्हतानुसार गट-क व गट-ड च्या नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांची वेगवेगळी प्रतिक्षासुची प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

त्यानुसार आपणांस कळविण्यांत येते की, सोबत सादर केलेल्या प्रपत्रामध्ये आपल्या शैक्षणिक अर्हतेनुसार व इच्छेनुसार गट –क किंवा गट-ड मधील संवर्गात नियुक्तीसाठी आपला पसंतीक्रम बदल सोबत दिलेल्या प्रपत्रातील अटी व शर्तीच्या अधिन राहून दिनांक 05/09/2025 पर्यंत सादर करावा.

आपला गट बदल पसंतीक्रम दिलेल्या मुदतीत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून आपल्या शैक्षणिक अर्हतेनुसार गट-क किंवा गट-ड निवडीसाठी पसंतीक्रम निश्चित करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

सोबत:- विहित प्रपत्र

Signed by
Minal Karanwal
Date: 28-08-2025 18:36:48
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जळगांव

प्रत:- मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.

अनुकंपा नियुक्ती गट बदल बाबत प्रपत्र नमुना

दिनांक:- /09/2025

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,जळगांव

विषय:- अनुकंपा नियुक्तीसाठी गट-क किंवा गट-ड संवर्गात पसंतीक्रम देणे बाबत.
संदर्भ:- आपल्या कडील पत्र दिनांक /09/2025
अर्जदार:- श्री/श्रीमती------------------------------------रा.--------ता.-----
जिल्हा-----------

महोदया,

कै.------------------------------------पदनांम---------- यांचे जि.प.सेवेत असतांना दिनांक / / रोजी निधन झाले असून आमच्या कुटुंबास शासनाच्या अनुकंपा नियुक्ती योजनेची माहिती देण्यांत आलेली आहे. त्या नुसार आमचे कुटुंब हे अनुकंपा नियुक्तीसाठी इच्छुक आहे.

माझे नांव अनुकंपा क च्या प्रतिक्षा सुचिमध्ये समाविष्ठ असून माझा अनुकंपा प्रतिक्षासुची क्रमांक ---- आहे. तसेच माझे शिक्षण पुढील प्रमाणे आहे.

अ.क्र. शैक्षणिक अर्हता

1. ----------------------------------------------

2. ----------------------------------------------

3. मराठी टंकलेखन :- आहे/नाही
4. इंग्रजी टंकलेखन :- आहे/नाही
5. संगणक अर्हता प्रमाणपत्र :- आहे/नाही

1) माझ्या शैक्षणिक अर्हतेनुसार अनुकंपा नियुक्तीसाठी मी खाली नमुद गटाची निवड करीत आहे.

किंवा

माझ्या शैक्षणिक अर्हता गट –क साठीची असूनही मी स्वखुशीने गट बदल करुन खालील नमुद गटाची निवड करीत आहे.

| | |
|---|---|
| पसंतीक्रम गट | |

उपरोक्त पसंतीक्रम गट नुसार अनुकंपा प्रतिक्षा सुचीत माझे नांव समाविष्ठ करावे ही विनंती.

**<u>शासन निर्णय दिनांक 17 जुलै,2025 मधील तरतुदीनुसार</u>**

1. सदर गट बदल विनंती ही फक्त एकदाच करता येईल व गट बदलाचा अर्ज जि.प.ला प्राप्त झाल्याच्या दिनांकास माझे नांव गट-ड च्या यादीत समाविष्ठ करण्यांत येईल याची मला जाणीव आहे.
2. गट बदलण्याची कार्यवाही केल्यानंतर पुन्हा मुळ गटात समाविष्ठ करुन अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय होणार नाही याचीही मला जाणीव आहे.
3. गट-क मधून गट-ड बदल केल्यामुळे गट-ड च्या पदावर एकदा अनुकंपा नियुक्ती दिल्यावर भविष्यात शैक्षणीक अर्हतेनुसार अनुकंपाच्या रिक्त होणा-या गट – क पदावर वर्ग केले जाणार नाही हे मला मान्य आहे.

**आपला नम्र**

संपर्ण नांव :--------------------------------
पत्ता:- ----------------------------------------
मोबाईल क्रमांक